दैनिक

मनोरंजनासह प्रबोधनासाठी...

epaper.rayatsamachar.com

# रयत समाचार

खिंचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी

संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक

● RNI No. MAHMAR/2011/40847 ● वर्ष १३ वे ● अंक ४९१ वा ● शुक्रवार, ता. ०९ जानेवारी २०२६ ● www.rayatsamachar.com ● पाने ४ ● मूल्य रु. ४.००

## ज्येष्ठ पर्यावरणतज्ज्ञ डॉ. माधव गाडगीळ यांचे निधन



**मुंबई । रयत समाचार**

ज्येष्ठ पर्यावरणतज्ज्ञ डॉ. माधव गाडगीळ यांचे पुणे येथे दीर्घ आजाराने निधन झाले. ते ८३ वर्षांचे होते. भारतातील पर्यावरण संशोधन, संरक्षण व संवर्धन धोरणांना दिशा देणाऱ्या या थोर पर्यावरणशास्त्रज्ञाच्या निधनाने पर्यावरण क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. डॉ. गाडगीळ यांनी पुण्यातील फर्ग्युसन महाविद्यालयातून जीवशास्त्र विषयात पदवी घेतली. त्यानंतर मुंबई विद्यापीठातून प्राणीशास्त्रात पदव्युत्तर शिक्षण पूर्ण करून १९६९ साली अमेरिकेतील हार्वर्ड विद्यापीठातून पीएच. डी. पदवी संपादन केली. हार्वर्डमध्ये त्यांनी गणितीय पर्यावरणशास्त्र व प्राण्यांच्या वर्तनावर संशोधन केले. भारतात परतल्यानंतर त्यांनी बंगळुरू येथील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्समध्ये कार्य केले. तेथील पर्यावरण विज्ञान केंद्राचे ते संस्थापक होते.

निवृत्तीनंतर पुण्यातील आघारकर संशोधन संस्था तसेच गोवा विद्यापीठातील शैक्षणिक उपक्रमांमध्ये ते सक्रिय राहिले. पंतप्रधानांची वैज्ञानिक सल्लागार परिषद, राष्ट्रीय सल्लागार परिषद, राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण आदी अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संस्थांमध्ये त्यांनी मोलाचे योगदान दिले. पश्चिम घाटातील जैवविविधतेचे संरक्षण व संवर्धन यासाठी त्यांच्या अध्यक्षतेखालील तज्ज्ञ समितीने सादर केलेला 'गाडगीळ अहवाल' देशभरात चर्चेचा विषय ठरला. पश्चिम घाटातील जैवविविधतेसाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत संयुक्त राष्ट्र संघाने २०२४ मध्ये त्यांना 'यूएनईपी चॅम्पियन ऑफ द अर्थ' या सर्वोच्च पर्यावरण पुरस्काराने सन्मानित केले होते. 'धिस फिशर्ड लँड' आणि 'इकॉलॉजी अँड इक्विटी' यांसारख्या महत्त्वपूर्ण ग्रंथांचे त्यांनी लेखन व सहलेखन केले असून, त्यांच्या २५० हून अधिक संशोधन निबंधांचे प्रकाशन झाले आहे. भारत सरकारने त्यांना १९८१ मध्ये पद्मश्री व २००६ मध्ये पद्मभूषण पुरस्काराने गौरविले. याशिवाय शांती स्वरूप भटनागर पुरस्कार, व्होल्वो पर्यावरण पुरस्कार, टायलर पुरस्कार आदी अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय सन्मान त्यांना प्राप्त झाले. राज्यपाल आचार्य देवव्रत, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार तसेच काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी त्यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शोकसंदेशात म्हटले आहे की, ''पर्यावरण संरक्षणाला विज्ञानाची आणि लोकसहभागाची जोड देणारे समर्पित व्यक्तिमत्व आपण गमावले आहे. विकास व पर्यावरण यांचा समतोल साधण्याचा वस्तुपाठ डॉ. गाडगीळ यांनी घालून दिला. पश्चिम घाटाच्या संरक्षणासाठी तसेच शाश्वत विकासासाठी त्यांनी केलेले कार्य सदैव स्मरणात राहील.'' मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही डॉ. गाडगीळ यांना श्रद्धांजली अर्पण करताना म्हटले की, ''पर्यावरण संतुलनासाठी आयुष्य वेचणारे डॉ. माधव गाडगीळ हे व्रतस्थ पर्यावरणशास्त्रज्ञ म्हणून सदैव स्मरणात राहतील. त्यांच्या निधनाने एका ऋषीतुल्य मार्गदर्शकाला आपण मुकलो आहोत.''

## महापालिका निवडणुकीच्या मतदानदिनी सार्वजनिक सुट्टी जाहीर

### राज्यातील २९ महापालिकांत १५ जानेवारीला मतदान

**मुंबई । रयत समाचार**

राज्यातील महापालिका निवडणुकांचा प्रचार अंतिम टप्प्यात पोहोचला असून बडे नेते प्रचाराच्या मैदानात उतरले आहेत. या पार्श्वभूमीवर भारत निवडणूक आयोग आणि प्रशासनाकडूनही तयारी अंतिम टप्प्यात आली आहे. ईव्हीएमसह प्रशासकीय तयारी जवळपास पूर्ण झाली असून मतदानाची प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी यंत्रणा सज्ज करण्यात आली आहे.

राज्यातील २९ महानगरपालिकांच्या निवडणुकीसाठी गुरुवार, ता. १५ जानेवारी २०२६ रोजी मतदान होणार आहे. त्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य शासनाने मतदानाच्या दिवशी संबंधित महानगरपालिका क्षेत्रात सार्वजनिक सुट्टी जाहीर केली आहे. याबाबतची अधिसूचना राज्य शासनाने प्रसिद्ध केली असून सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये, महामंडळे, मंडळे व सार्वजनिक उपक्रमांच्या निदर्शनास आणण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. ही सार्वजनिक सुट्टी संबंधित महानगरपालिका निवडणूक क्षेत्रातील तसेच कामानिमित्त मतदारसंघाबाहेर असलेल्या मतदारांनाही लागू राहणार आहे. महानगरपालिका क्षेत्रांतील केंद्र शासनाची कार्यालये, निमशासकीय कार्यालये, सार्वजनिक उपक्रम, बँका व तत्सम आस्थापनांनाही ही सुट्टी लागू राहील, असे अधिसूचनेत नमूद करण्यात आले आहे. सार्वजनिक सुट्टी लागू असलेल्या महानगर पालिकांमध्ये बृहन्मुंबई, ठाणे, नवी मुंबई, उल्हासनगर, कल्याणडोंबिवली, भिवंडीनिजामपूर, मीराभाईंदर, वसईविरार, पनवेल, नाशिक, मालेगाव, अहिल्यानगर, जळगाव, धुळे, पुणे, पिंपरीचिंचवड, सोलापूर, कोल्हापूर, इचलकरंजी, सांगलीमिरजकुपवाड, छत्रपती संभाजीनगर, नांदेडवाघाळा, परभणी, जालना, लातूर, अमरावती, अकोला, नागपूर आणि चंद्रपूर यांचा समावेश आहे. दरम्यान, लोकशाहीच्या या उत्सवात मतदारांनी सक्रिय सहभाग नोंदवून मतदानाचा हक्क बजावावा, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

# अमेरिकेचे रशियन तेलावर कठोर निर्बंध

## भारतासह इतर देशांवर ५००% कराचा प्रस्ताव

**वॉशिंग्टन । रयत समाचार**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी रशियाविरुद्ध कठोर आर्थिक निर्बंध लादणाऱ्या विधेयकास मंजुरी दिली आहे. इकॉनॉमिक टाईम्सच्या वृत्तानुसार, या विधेयकात रशियाकडून कच्चे तेल खरेदी करणाऱ्या देशांवर, विशेषतः भारत, चीन आणि ब्राझीलवर ५०० टक्क्यांपर्यंत आयात कर लावण्याची तरतूद आहे. 'सँक्शनिंग ऑफ रशिया ॲक्ट २०२५' असे नाव असलेले हे विधेयक युक्रेन युद्धाच्या पार्श्वभूमीवर रशियावर आर्थिक दबाव वाढवण्यासाठी तयार करण्यात आले आहे. रिपब्लिकन सिनेटर लिंडसे ग्राहम यांनी बुधवारी व्हाईट हाऊसमध्ये राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्याशी चर्चा केली. या चर्चेदरम्यान ट्रम्प यांनी हे विधेयक काँग्रेसमध्ये मांडण्यास हिरवा कंदील दिला. पुढील आठवड्यात या विधेयकावर काँग्रेसमध्ये मतदान होण्याची शक्यता आहे. अमेरिकेचा आरोप आहे की



रशियाकडून स्वस्त दरात कच्चे तेल खरेदी करून काही देश अप्रत्यक्षपणे युक्रेन युद्धात रशियाला आर्थिक मदत करत आहेत. त्यामुळे अशा देशांवर कठोर आर्थिक निर्बंध लादण्याचा अमेरिकेचा विचार आहे. अमेरिकेने रशियन तेल खरेदीवर आधीच २५ टक्के अतिरिक्त कर लादला असून, भारतावर एकूण ५० टक्के कर लागू आहे. या प्रस्तावित विधेयकामुळे भारतासमोर नव्या अडचणी निर्माण होण्याची शक्यता आहे. या करामुळे भारताच्या अमेरिकेतील निर्यातीवर परिणाम होत असून, दोन्ही देशांदरम्यान व्यापार करारासाठी चर्चा सुरू आहे. भारताने हा एकूण कर १५ टक्क्यांपर्यंत कमी करण्याची तसेच रशियन तेलावर लादलेला अतिरिक्त २५ टक्के दंड पूर्णतः रद्द करण्याची मागणी केली आहे. नववर्षात या चर्चेतून ठोस निर्णय होण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. लिंडसे ग्राहम यांनी सांगितले की, सुमारे महिनाभरापूर्वी त्यांनी भारतीय राजदूत विनय मोहन क्वात्रा यांच्या निवासस्थानी भेट दिली होती. त्या वेळी भारताकडून रशियन तेल खरेदी कमी करण्यावर चर्चा झाली होती. तसेच भारतावर लादलेला अतिरिक्त २५ टक्के कर मागे घ्यावा, असा संदेश राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्यापर्यंत पोहोचवण्याची विनंती भारतीय राजदूतांनी केली होती, असे ग्राहम यांनी सांगितले. २०२१ नंतर प्रथमच भारताने रशियाकडून कच्च्या तेलाची आयात कमी केली आहे. रॉयटर्सच्या वृत्तानुसार, नोव्हेंबरमध्ये दररोज सुमारे १.७७ दशलक्ष बॅरल असलेली भारताची रशियन तेल आयात डिसेंबरमध्ये सुमारे १.२ दशलक्ष बॅरल प्रतिदिनपर्यंत घसरली आहे. येत्या काही महिन्यांत ती १ दशलक्ष बॅरलपेक्षा कमी होण्याची शक्यता आहे. रोझनेफ्ट आणि लुकोइल या प्रमुख रशियन तेल कंपन्यांवर अमेरिकेने २१ नोव्हेंबरपासून निर्बंध लागू केल्यानंतर भारताची तेल आयात घटू लागल्याचेही स्पष्ट झाले आहे.

## संजय राऊत-एकनाथ शिंदे भेट

### शिंदेंकडून प्रकृतीची विचारपूस



**मुंबई । रयत समाचार**

मुंबई महानगरपालिका निवडणुकीचा प्रचार ऐन भरात असताना मुंबईत एक महत्त्वाची राजकीय घडामोड घडली. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांची गुरुवारी मुंबईत अचानक भेट झाली. या भेटीचा फोटो सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. गुरुवारी मुंबईतील एका हिंदी वृत्तवाहिनीच्या कार्यक्रमासाठी दोन्ही नेते उपस्थित होते. एकनाथ शिंदे यांची मुलाखत संपल्यानंतर ते स्टुडिओबाहेर पडत असताना, संजय राऊत आपल्या मुलाखतीसाठी स्टुडिओकडे जात होते. याच वेळी दोघे समोरासमोर आले. एकमेकांकडे पाहून अभिवादन केल्यानंतर एकनाथ शिंदे यांनी संजय राऊत यांच्या प्रकृतीची विचारपूस केली. संजय राऊत हे नुकतेच गंभीर आजारपणातून सावरले असून, आजारपणाच्या काळात एकनाथ शिंदे यांनी राऊतांचे बंधू सुनील राऊत यांच्याशी दूरध्वनीवरून तब्येतीची चौकशी केली होती. या भेटीत संजय राऊत यांनीही एकनाथ शिंदे यांच्या प्रकृतीबाबत विचारणा केली. त्यानंतर एक-दोन मिनिटे अनौपचारिक चर्चा करून दोन्ही नेते आपापल्या दिशेने मार्गस्थ झाले. एकनाथ शिंदे यांच्या बंडानंतर शिवसेना पक्षात फूट पडली होती. त्यानंतर पक्ष व धनुष्यबाण हे चिन्ह शिंदे गटाला मिळाल्याने तो अधिकृत शिवसेना ठरला. या पार्श्वभूमीवर उद्धव ठाकरे व एकनाथ शिंदे यांच्यात तीव्र राजकीय संघर्ष निर्माण झाला होता. मुंबई महापालिका निवडणुकीचा प्रचार सुरू झाल्यापासून ठाकरे गटाकडून सातत्याने शिंदे यांच्यावर टीका केली जात आहे. संजय राऊतही पत्रकार परिषदांतून शिंदे यांच्यावर जोरदार टीका करत असतात. मात्र, या सर्व राजकीय मतभेदांवर पडदा टाकत गुरुवारी दोन्ही नेत्यांनी सुसंस्कृतपणे संवाद साधल्याने मुंबई महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर या भेटीची महाराष्ट्राच्या राजकारणात जोरदार चर्चा रंगली आहे.

## घनकचऱ्यापासून वीज, गॅस निर्मिती प्रकल्पासाठी राज्य सरकार सहकार्य करेल- मुख्यमंत्री फडणवीस

**अहमदनगर । रयत समाचार**

अहिल्यानगर येथील एमआयडीसीचा विस्तार करत ती नॅशनल डिफेन्स कॉरिडॉर म्हणून विकसित करण्यात येणार असून, शहराच्या ४९२ कोटी रुपयांच्या सुधारित पाणीपुरवठा योजनेला एका महिन्यात मान्यता दिली जाईल, असे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजप व राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) उमेदवारांच्या प्रचारासाठी गुरुवारी आयोजित सभेत ते बोलत होते. यावेळी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, विधान परिषदेचे सभापती राम शिंदे, आमदार संग्राम जगताप, आमदार मोनिका राजळे, आमदार विक्रमसिंह पाचपुते, माजी मंत्री बबनराव पाचपुते, भाजपचे प्रदेश संघटनमंत्री विजय चौधरी, शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, राष्ट्रवादीचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर आदी उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, शहर विकास आराखड्यातील रस्त्यांसाठी ३५० कोटींचा प्रस्ताव राज्य सरकारकडे प्राप्त झाला आहे. यापूर्वी १५० कोटींचा निधी देण्यात आला असून त्यातील २४ पैकी १३ रस्त्यांची कामे पूर्ण झाली आहेत. क्रीडा संकुलासाठीही मदत करण्यात येईल. घनकचऱ्यापासून वीज व गॅस निर्मिती प्रकल्पासाठी राज्य सरकार सहकार्य करेल, असेही त्यांनी स्पष्ट





केले. प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत ज्यांच्याकडे घरासाठी जमीन नाही अशा झोपडपट्टी व अतिक्रमणधारकांना जमिनीच्या मालकीचा हक्क देण्यात येणार आहे. आमदार संग्राम जगताप व माजी खासदार सुजय विखे यांनी सर्वेक्षण करून अशा कुटुंबांना 'पीआर कार्ड' देण्याची प्रक्रिया सुरू करावी. या माध्यमातून गरिबांसाठी आवश्यक तेवढी घरे उपलब्ध करून दिली जातील, असे मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले. तसेच सिंधी व पंजाबी समाजातील निर्वासितांना 'फ्री होल्ड' जागा देण्याचा निर्णय नगरमध्येही राबविला जाईल, असे त्यांनी सांगितले. पालकमंत्री विखे यांनी शहराच्या विकासासाठी विशेष लक्ष देण्याची मागणी केली. जलसंपदा विभागामार्फत सीना नदीचे सौंदर्यीकरण केले जाईल, अशी घोषणाही त्यांनी केली. प्रास्ताविकात आमदार संग्राम जगताप यांनी शहर विकासासाठी मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करून देण्याची मागणी केली. माजी खासदार विखे यांनी आभार मानले. राज्यात भाजप, अजित पवार गट व शिवसेनेचा शिंदे गट यांची महायुती असली तरी नगर महापालिका निवडणुकीत भाजप व अजित पवार गट एकत्र असून शिंदे गट विरोधात आहे. मात्र, मुख्यमंत्री फडणवीस यांनी सभेत कोणत्याही विरोधकावर टीका टाळली. ''मी येथे टीका करण्यासाठी नव्हे, तर विकासासाठी आलो आहे,'' असे सांगत त्यांनी संयम राखला. भाजपमधील अंतर्गत मतभेदांवर भाष्य करत पालकमंत्री विखे म्हणाले की, पक्षात नवा-जुना असा कोणताही वाद नाही. जो काही तिढा होता, तो एकत्र बसून सोडविण्यात आला आहे. शहराचे नामांतर अहिल्यानगर झाल्यानंतर होणारी ही पहिली सार्वत्रिक महापालिका निवडणूक असल्याचा उल्लेख आमदार संग्राम जगताप यांनी केला. काहीजण पुन्हा नामांतराची भाषा करत असले तरी ते कदापि होऊ देणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. यानंतर मुख्यमंत्र्यांनीही नामांतरानंतरचा पहिला महापौर युतीचाच असेल, असा दावा केला. पालकमंत्री विखे यांनीही युती महापालिका निवडणुकीत 'हॅट्रिक' साधेल, असा विश्वास व्यक्त केला.

## सकारात्मक विचारातूनच युवक आणि देश घडतो – मंत्री डॉ. रमेश तवडकर

**पैगिंण । रयत समाचार**

आदर्शग्राम आमोणेपैगिंण येथे आयोजित युवा सक्षमीकरण कार्यक्रमात बोलताना कला व संस्कृती खात्याचे मंत्री डॉ. रमेश तवडकर यांनी युवकांनी सकारात्मक दृष्टिकोन ठेवण्याचे आवाहन केले. समाजाच्या जडणघडणीत केवळ २० टक्के लोक सक्रिय योगदान देतात; मात्र नकारात्मक विचारातून समाजकार्य घडू शकत नाही. त्यामुळे अशा लोकांचा देशाच्या विकासात सहभाग दिसून येत नाही, असे ते म्हणाले. मंत्री डॉ. तवडकर पुढे म्हणाले की, सकारात्मक दृष्टिकोनातून विचार करणाऱ्या युवकांना नेहमीच पाठबळ मिळते. गेली ३० वर्षे आदर्श युवा संघ योग्य मार्गदर्शनाखाली सातत्याने कार्यरत असून, खडतर प्रवासातून या संस्थेची उभारणी झाली आहे. ग्रामीण संस्कृतीची कास सोडणारा युवक कुठेही यशस्वी होऊ शकत नाही. आदर्श युवा संघाच्या कार्याची




दखल घेत पंतप्रधानांनीही याविषयी सखोल चौकशी केली होती. ही संस्था इतरांसाठी आदर्श ठरत असून, निर्व्यसनी युवक घडवून त्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करत आहे. काणकोण तालुक्यात जगाशी स्पर्धा करू शकेल अशी शैक्षणिक साधने उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जाईल. युवक आर्थिकदृष्ट्या सक्षम असेल तरच समाज आणि देश समृद्धीकडे जाईल. चांगल्या संगतीचा विसर पडू देऊ नका. रिकाम्या पोटी समाजकार्य होऊ शकत नाही, असे स्पष्ट करत समविचारी युवक एकत्र आले तर त्यांना पाठबळ देण्याचे काम भारतीय जनता पक्षाचे सरकार करेल, अशी ग्वाही त्यांनी दिली. केवळ १० टक्के युवक स्वयंभू झाले तरी समाज बदलण्यासाठी फार वेळ लागणार नाही, असेही त्यांनी नमूद केले. आत्मनिर्भर भारत व स्वयंपूर्ण गोंय या संकल्पनेअंतर्गत नियोजन, सांख्यिकी व मूल्यांकन संचालनालयातर्फे आयोजित या युवा सक्षमीकरण कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून मंत्री डॉ. रमेश तवडकर उपस्थित होते. कार्यक्रमाला क्रीडा खात्याचे कार्यकारी संचालक डॉ. अजय गावडे, पैगिंण जिल्हा पंचायत सदस्य अजय लोलयेंकर, नियोजन, सांख्यिकी व मूल्यांकन संचालनालयाचे उपसंचालक कैलाश गोखले, पैगिंण पंचायत सरपंच सविता तवडकर, दक्षिण गोवा भाजप उपाध्यक्ष महेश नाईक, आदर्श युवा संघाचे अध्यक्ष चंद्रकांत वेळीप, खोतिगांव पंचायत सरपंच जयेश गावकर, काणकोण भाजप मंडळ अध्यक्ष प्रभाकर गावकर, संघाचे सचिव दिपक वेळीप, गंगेश वेळीप, रूपेश तवडकर, विनय तुबकी आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी क्रीडा खात्याचे कार्यकारी संचालक डॉ. अजय गावडे यांनी युवक सक्षमीकरणावर मार्गदर्शन करताना सांगितले की, आजचा युवक हा उद्याच्या देशाचा कणा आहे. युवकांना सक्षम, आत्मविश्वासपूर्ण व संधीसज्ज बनविणे हेच खरे युवा सक्षमीकरण असून, क्रीडा, शिक्षण व कौशल्य विकासाच्या माध्यमातून युवकांमध्ये शिस्त, नेतृत्वगुण व सकारात्मक दृष्टिकोन निर्माण होतो. युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक पायाभूत सुविधा, प्रशिक्षण व व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी क्रीडा खाते कटिबद्ध असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सिद्धी उपाध्याय यांनी केले. स्वागत आदर्श युवा संघाचे अध्यक्ष चंद्रकांत वेळीप यांनी केले, तर आभार प्रदर्शन नियोजन, सांख्यिकी व मूल्यांकन संचालनालयाचे उपसंचालक कैलाश गोखले यांनी केले.



# लोकशाही उत्सव

## अहिल्यानगर महानगरपालिका निवडणूक – २०२५-२६





# प्रचारासाठी खासदार लंके मैदानात

## महाविकास आघाडीची सारसनगरमधून प्रचार रॅली

**अहमदनगर । रयत समाचार**

महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी सारसनगर परिसरातून प्रचार रॅली काढण्यात आली. ढोल-ताशांच्या गजरात आणि कार्यकर्त्यांच्या जोशपूर्ण घोषणांमुळे संपूर्ण परिसर निवडणूक वातावरणाने दणाणून गेला. या प्रचार रॅलीत खासदार निलेश लंके यांनी स्वतः सहभाग घेत मतदारांशी थेट संवाद साधला. घराघरांत जाऊन मतदारांच्या गाठीभेटी घेत त्यांनी महाविकास आघाडीच्या उमेदवारांना भरघोस मतांनी विजयी करण्याचे आवाहन केले. जनतेच्या प्रश्नांना न्याय देणारे आणि सर्वसामान्यांच्या हिताचे काम करणारे नेतृत्व महाविकास आघाडीकडे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.



महाविकास आघाडीच्या प्रभाग क्रमांक १३ मधील राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे उमेदवार रोहन रमेश शेलार (अ), कल्याणी महेंद्र गाडळकर (ब), अर्चना सुरेश गायकवाड (क) व चंद्रकांत आनंद उजागरे (ड) यांच्या प्रचारासाठी ही रॅली आयोजित करण्यात आली होती. उमेदवारांनी नागरिकांशी संवाद साधत प्रभागाच्या विकासासाठी संधी देण्याचे आवाहन केले. या रॅलीत राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष व माजी महापौर अभिषेक कळमकर, राष्ट्रवादीचे विधानसभा अध्यक्ष निलेश मालपाणी, माजी नगरसेवक संजय झिंजे, मतीन शेख आदींसह पदाधिकारी, कार्यकर्ते व समर्थक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. नगरसोलापूर रोड, कोंबडीवाला मळा तसेच सारसनगर परिसरातून ही प्रचार रॅली काढण्यात आली. रॅलीदरम्यान नागरिकांनी महाविकास आघाडीच्या उमेदवारांचे स्वागत करत सकारात्मक प्रतिसाद दिला.

# नवदृष्टीतून बजावणार मतदानाचे कर्तव्य

## नेत्रशस्त्रक्रियेनंतर ज्येष्ठांचा मतदानाचा संकल्प

**अहमदनगर । रयत समाचार**

महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर विविध सामाजिक संस्थांकडून मतदार जागृतीचे उपक्रम राबविले जात असताना, फिनिक्स सोशल फाउंडेशनने सामाजिक बांधिलकी जपत एक आगळा-वेगळा उपक्रम हाती घेतला आहे. फाउंडेशनच्या पुढाकाराने मोफत नेत्र तपासणी शिबिर व मोतीबिंदू शस्त्रक्रियेच्या माध्यमातून नवदृष्टी मिळालेल्या ज्येष्ठ नागरिक व महिलांना मतदानाचे कर्तव्य बजावण्याचे आवाहन करण्यात आले. नागरदेवळे येथे नुकतेच आयोजित मोफत नेत्र तपासणी व शस्त्रक्रिया शिबिरास महिलांसह ज्येष्ठ नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या शिबिरात मोतीबिंदू व काचबिंदूग्रस्त रुग्णांची तपासणी करून त्यांची मोफत शस्त्रक्रिया पुणे येथील के. के. आय. बुधराणी रुग्णालय येथे यशस्वीरीत्या करण्यात आली. शस्त्रक्रियेनंतर दृष्टी परत मिळालेल्या रुग्णांचे शहरात आगमन होताच फाउंडेशनतर्फे त्यांचे स्वागत करण्यात आले. फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष जालिंदर बोरुडे यांनी नवदृष्टी मिळालेल्या ज्येष्ठांशी संवाद साधत, या दृष्टीचा उपयोग लोकशाही बळकट करण्यासाठी मतदानाचा हक्क बजावण्यासाठी करावा, असे आवाहन केले. ''मतदान हा प्रत्येक नागरिकाचा अधिकार व कर्तव्य आहे. नवदृष्टीतून चांगला, प्रामाणिक व विकासाभिमुख उमेदवार निवडण्यासाठी सर्वांनी मतदान करावे,'' असे त्यांनी सांगितले. यावेळी उपस्थित ज्येष्ठ नागरिक व महिलांनी योग्य उमेदवाराची निवड करून मतदानाचा हक्क बजावण्याचा निर्धार व्यक्त केला. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील दृष्टीहीन व अल्पदृष्टीग्रस्त रुग्णांना दृष्टी मिळावी यासाठी फिनिक्स सोशल फाउंडेशनने जिल्हाभरात व्यापक सामाजिक चळवळ उभी केली असून, नियमित मोफत नेत्र तपासणी शिबिरे तसेच मोतीबिंदू व काचबिंदूच्या मोफत शस्त्रक्रिया राबविल्या जात आहेत. आरोग्यसेवेसोबतच मतदार जागृतीचे उपक्रमही फाउंडेशनमार्फत राबविले जात असल्याची माहिती अध्यक्ष जालिंदर बोरुडे यांनी दिली.

# उमेदवारांची शपथपत्रे संकेतस्थळावर प्रसिद्ध; पहा कोण किती श्रीमंत आणि गुन्हेगार

**अहमदनगर । रयत समाचार**

अहिल्यानगर महानगरपालिकेच्या आगामी सार्वत्रिक निवडणूक २०२५२६ च्या पार्श्वभूमीवर निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी त्यांच्या उमेदवारी अर्जासोबत दाखल केलेली शपथपत्रे (Affidavits) अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहेत. महानगरपालिका निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकता राखण्यासाठी व मतदारांना उमेदवारांविषयी माहिती उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने ही शपथपत्रे महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली असून नागरिक व इच्छुक मतदारांनी उमेदवारांची वैयक्तिक माहिती, शैक्षणिक पात्रता, मालमत्ता, उत्पन्न, कर्ज तसेच गुन्हेगारी पार्श्वभूमी (असल्यास) याबाबतची माहिती पाहण्यासाठी https://amc.gov.in/election/ या संकेतस्थळाला भेट देण्याचे आवाहन मनपाच्या वतीने करण्यात आले आहे. निवडणूक प्रक्रियेत मतदारांनी जागरूकपणे सहभाग घ्यावा व माहितीच्या आधारे निर्णय घ्यावा, यासाठी ही माहिती सार्वजनिक करण्यात आल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले.

# प्रभाग ४ मधून काँग्रेसच्या प्रचाराला वेग



**अहमदनगर । आबीद खान**

अहिल्यानगर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२६ च्या पार्श्वभूमीवर मुकुंदनगर प्रभाग क्रमांक ४ मध्ये काँग्रेस पक्ष व महाविकास आघाडीच्या अधिकृत उमेदवारांच्या प्रचाराला वेग आला आहे. या पार्श्वभूमीवर संगमनेर येथील काँग्रेसचे नगरसेवक अहिल्यानगरमध्ये दाखल झाले असून, प्रभाग क्रमांक ४ मधील उमेदवारांच्या वतीने त्यांचा जंगी सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमात महाविकास आघाडी/काँग्रेसचे अधिकृत उमेदवार शेख फैय्याज अजीजोद्दीन (ओबीसी पुरुष), शेख नसीम खानसाहेब (ओबीसी महिला अ), खान मिनाज जाफर (सर्वसाधारण महिला क) आणि शम्स हाजी समीर खान (सर्वसाधारण पुरुष) उपस्थित होते. उमेदवारांनी ''मैं नहीं, हम मुकुंदनगर'' या घोषणेसह सामूहिक विकासाचे राजकारण करण्याचा निर्धार व्यक्त केला. सत्कारप्रसंगी संगमनेर काँग्रेसचे नगरसेवक अमजद पठाण, नूर मोहम्मद शेख, डॉक्टर दानिश, लाला मुजीब खान, मोईन बेग व साजिद पठाण यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी शेख फैय्याज अजीजोद्दीन म्हणाले, ''ही निवडणूक केवळ उमेदवारांची नसून प्रभागाच्या भविष्यासाठीची आहे. 'मैं नहीं, हम मुकुंदनगर' या भावनेतून आम्ही काम करत आहोत. मजहबाच्या नावावर राजकारण न करता, सेवा, प्रामाणिकपणा व माणुसकीच्या मार्गावर चालण्याचा आमचा प्रयत्न आहे. पाणी, रस्ते, स्वच्छता, आरोग्य व शिक्षण या मूलभूत प्रश्नांवर ठोस काम करण्याचा निर्धार असून जनतेचा विश्वास हाच आमचा खरा आधार आहे. हात बदलेगा हालात इंशाअल्लाह!'' संगमनेरच्या नगरसेवकांच्या उपस्थितीमुळे प्रभागातील कार्यकर्त्यांमध्ये उत्साह संचारला असून प्रचाराला मोठे बळ मिळाल्याचे दिसून येत आहे. यावेळी उपस्थित मान्यवरांनी काँग्रेस पक्षाची विकासाभिमुख व सर्वसमावेशक भूमिका अधोरेखित केली. या कार्यक्रमाला काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. नागरिकांचा वाढता प्रतिसाद पाहता प्रभाग क्रमांक ४ मध्ये काँग्रेस व महाविकास आघाडीचा प्रचार दिवसेंदिवस अधिक प्रभावी होत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

# मनपा स्वीप समितीकडून 'लोकशाहीचे फोटो' फोटोग्राफी स्पर्धा

## लोकशाही, निवडणूक प्रक्रियेवरील छायाचित्रे पाठविण्याचे आवाहन

**अहमदनगर । रयत समाचार**

अहिल्यानगर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५२६ मध्ये मतदारांमध्ये जनजागृती होऊन मतदानाची टक्केवारी वाढावी, यासाठी मनपा स्वीप समितीच्या वतीने छायाचित्रकारांसाठी 'लोकशाहीचे फोटो' या फोटोग्राफी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ''मतदानाची दृष्टी फुलवी लोकशाहीची सृष्टी'' हे या स्पर्धेचे घोषवाक्य असून, ही स्पर्धा (१) व्यावसायिक, (२) प्रेस फोटोग्राफर, (३) हौशी, (४) शालेय गट (पाचवी ते बारावी मोबाईल फोटोग्राफी) आणि (५) खुला गट (मोबाईल फोटोग्राफी) अशा पाच गटांत होणार आहे. लोकशाही, मतदान, निवडणूक प्रक्रिया, मतदार जनजागृती व बोटावरील लोकशाहीची शाई हे पाच विषय स्पर्धेसाठी निश्चित करण्यात आले आहेत. स्पर्धकांनी आपली छायाचित्रे इमेज/पीडीएफ/डॉक्युमेंट स्वरूपात स्वतःचे नाव, मोबाईल क्रमांक, पत्ता व गट नमूद करून पाठवावीत. तसेच ''हा फोटो मी स्वतः काढलेला आहे'' असा आशय असलेले प्रतिज्ञापत्र जोडणे आवश्यक आहे.




हे साहित्य देशातील पहिल्या 'अहिल्यानगर मनपा स्वीप केअर' या व्हॉट्सअॅप क्रमांक ८०५५८०९३९४ वर दि. १७ जानेवारी २०२६ पर्यंत पाठवायचे आहे. एका स्पर्धकाला एकापेक्षा अधिक छायाचित्रे पाठविता येतील. परीक्षकांचा निर्णय अंतिम राहील. सहभागी सर्व स्पर्धकांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. स्पर्धेत आदर्श आचारसंहितेच्या नियमांचे पालन करणे बंधनकारक राहील. जिल्ह्यातील अधिकाधिक स्पर्धकांनी या स्पर्धेत सहभागी व्हावे, असे आवाहन निवडणूक अधिकारी तथा मनपा आयुक्त व प्रशासक यशवंत डांगे, अतिरिक्त आयुक्त विजयकुमार मुंढे, स्वीप नोडल अधिकारी व सहाय्यक आयुक्त अशोक साबळे, सहाय्यक आयुक्त मेहेर लहारे, मतदारदूत डॉ. अमोल बागुल, प्रसिद्धी अधिकारी नितीन ब्राह्मणे व प्रशासनाधिकारी जुबेर पठाण यांनी केले आहे.

# अहिल्यानगर महापालिका निवडणूक
# आचारसंहिता भंगाच्या २० दिवसांत अवघ्या ६ तक्रारी

## दोन ठिकाणी पैसे वाटपाचे आरोप

**अहमदनगर । रयत समाचार**


महापालिका निवडणुकीची आचारसंहिता लागू झाल्यापासून २० दिवसात आचारसंहितेचे उल्लंघन झाल्याच्या अवघ्या सहा तक्रारी महापालिकेकडे दाखल झाल्या आहेत. यातील दोन तक्रारी पैसे वाटपाच्या, दोन तक्रारी कार्यक्रमांच्या आहेत. एक तक्रार सोशल मीडियावर बदनामीकारक मजुराची, तर एक तक्रार भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत झालेल्या युतीच्या सभेवेळी दुकाने बंद केल्याबाबत आहे. कार्यक्रमाबाबतच्या तक्रारी निकाली काढण्यात आल्या, असून इतरांचे अहवाल प्रलंबित आहेत. प्रभाग १० मध्ये मतदारांना पैशांचे आमिष दाखवण्याचा प्रयत्न होत असल्याची तक्रार होती.

या प्रकरणात पैसे व दुचाकी जप्त करण्यात आली आहे. मात्र, अद्याप कारवाई झालेली नाही. दुसरी तक्रार प्रभाग १५ मध्ये पैसे वाटपाबाबत करण्यात आली होती. मात्र, यात तथ्य आढळून आले नाही. या दोन्हींचे अहवाल प्रलंबित आहेत. रवींद्र चव्हाण यांच्या सभेच्या ठिकाणी दुकाने बंद करण्यात आल्याची तक्रार आहे. तर, सोशल मीडियावर समाजात तेढ निर्माण होईल असा चिथावणीखोर मजकूर टाकून उमेदवाराची बदनामी केल्याची तक्रार करण्यात आली आहे. या दोन्हींवर अद्याप अहवाल प्रलंबित आहेत. दरम्यान, आचारसंहिता भंगाच्या तक्रारी आता निवडणूक अधिकारी कार्यालयातही करता येणार आहेत. तेथेही स्वतंत्र कक्ष तयार करण्यात आला असून अधिकारी व कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत. तसेच, निवडणूक काळात होणारे गैरप्रकार रोखण्यासाठी व तक्रार आल्यास कारवाईसाठी सहा भरारी पथके नियुक्त करण्यात आली आहेत. त्यात अधिकारी व पोलिस कर्मचाऱ्यांचा समावेश आहे.


## रयत समाचार Classified छोटी जाहिरात

### छोटी जाहिरात, उत्तम प्रतिसाद

खरेदी विक्री । नोकरी विषयक । नावात बदल
आरोग्य विषयक । वाढदिवस । विवाह विषयक




निसार Art

सर्व प्रकारच्या व्यावसायिक क्षेत्रातील वॉल पेन्टीग जाहिरात (भिंत पेंटिंग) साठी राज्यातील नावाजलेले निसार आर्ट

7020356335 | 9860830016

पत्ता : प्लॉट नं.३, नवीन महानगरपालिकेसमोर, औरंगाबाद रोड, अ.नगर.

रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!
कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द

**जगदंबा टी सेंटर**

चहा, कॉफी, लेमन टी

शाखा नं.१- माणिक चौक, अ.नगर
शाखा नं.२- वसंत टॉकीजजवळ, भोला पान सेन्टर शेजारी, अ.नगर

प्रो.प्रा. रावसाहेब ठोंबे
97655 58585

**हॉटेल भाड्याने देणे**

नगर-सोलापूर हायवेपासून पाच मिनिटांच्या अंतरावर असणाऱ्या कानडेमळा येथील सारसनगर चौकातील सुस्थितीत असणारे हॉटेल भाड्याने चालविण्यास देणे आहे. किमान ३० ते ५० लोक एकावेळी बसतील अशी पीओपी आणि लाईट फिटिंगसह बैठक व्यवस्था, व्हेज-नॉन, व्हेजसाठी स्वतंत्र किचन, सर्व किचन साहित्य टेबल, सोफे, पाण्याची व्यवस्था इत्यादीसह देणे आहे.

– संपर्क –
९०११११३७००

सर्व प्रकारच्या छोट्या जाहीरातींसाठी ८८०५४०१८०० | ७७७४००१८०० | ९८२२४९६६६४ या क्रमांकावर संपर्क करा


हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 **Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक : दिपक शिरसाठ,** 7774001800, **समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा,** 9373021584, **गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी – गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफीसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक,** 9036799516,shrikantkaktikar@gmail.com (वाद-विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)

# भारतीय परंपरा ज्ञानाबरोबरच संस्कारही शिकविते- प्रा. कुलकर्णी



**पाथर्डी । नितीन गटाणी**

भारतीय ज्ञान परंपरेला १९६० च्या दशकापर्यंत मुख्य प्रवाहापासून दूर ठेवण्याचा प्रयत्न झाला. मात्र कालांतराने तिचे महत्त्व ओळखले गेले असून नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात भारतीय ज्ञान परंपरेचा समावेश करण्यात आला आहे. भारतीय ज्ञान परंपरा ही केवळ ज्ञान देत नाही, तर संस्कारही घडविते, असे प्रतिपादन प्रा. सुनील कुलकर्णी यांनी केले. ते येथील बाबुजी आव्हाड महाविद्यालयात केंद्रीय हिंदी संस्थान, आग्रा व महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित भारतीय ज्ञान परंपरेच्या अनुषंगाने हिंदी व मराठी साहित्य या विषयावरील दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पार्थ विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष व पाथर्डीचे नगराध्यक्ष अभय आव्हाड होते. व्यासपीठावर ज्येष्ठ हिंदी साहित्यिक डॉ. श्रीराम परिहार, प्रमुख अतिथी डॉ. दामोदर खडसे, प्राचार्य डॉ. बबन चौरे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठाच्या हिंदी अभ्यास मंडळाच्या अध्यक्षा डॉ. अपर्णा पाटील, डॉ. सुनील डहाळे, डॉ. फत्ताराम नायक, डॉ. संदीप, माजी प्राचार्य डॉ. जी. पी. ढाकणे, डॉ. अशोक डोळस आदी उपस्थित होते.

प्रा. कुलकर्णी पुढे म्हणाले की, पूर्वी अभ्यासक्रमावर पाश्चात्य विचारसरणीचा प्रभाव असल्याने भारतीय ज्ञान परंपरा दुर्लक्षित राहिली. पाश्चात्य विचारांचा परिणाम आपल्या खानपान, वेशभूषा व जीवनशैलीवर झाला. गुरुकुल शिक्षणपद्धतीत ज्ञानाबरोबरच संस्कार दिले जात. आज एआयच्या युगात ज्ञान मिळेल; मात्र संस्कार मिळणार नाहीत. आज ज्ञानापेक्षा संस्कारांची अधिक गरज आहे. प्रत्येक आजाराचे मूळ ताणतणावात असून साधना व मनन तणावमुक्तीसाठी आवश्यक आहे. लिव्ह-इन रिलेशनशिपसारख्या संकल्पनांना भारतीय ज्ञान परंपरा मान्यता देत नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले. प्रमुख अतिथी डॉ. दामोदर खडसे यांनी हिंदी विषयातून पदवी घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करिअर संधींवर मार्गदर्शन केले. ज्ञानाबरोबर रोजगारालाही महत्त्व असून रोजगाराशिवाय जीवन शक्य नाही, असे ते म्हणाले. शून्य व अपूर्णांक पद्धतीचा शोध ही भारताची जगाला दिलेली देणगी असून गणिताशिवाय कोणतेही तंत्रज्ञान अपूर्ण आहे. ज्ञान दुसऱ्याला सांगितल्यावर ते विज्ञान होते, असेही त्यांनी नमूद केले. बीजभाषक डॉ. श्रीराम परिहार यांनी नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात भारतीय ज्ञान परंपरेच्या समावेशाचे महत्त्व विशद केले. भारतीय ज्ञान परंपरेची मुळे संस्कृतीत खोलवर रुजलेली असून तीच आपल्याला प्रकाशाकडे नेते. आयुर्वेदाचा वाढता प्रसार हा भारतीय ज्ञान परंपरेचाच परिपाक आहे. स्वामी विवेकानंद यांनी १८९३ मध्ये शिकागो धर्मपरिषदेत भारतीय ज्ञान परंपरेचे दर्शन जगाला घडविले. ही परंपरा संवेदनशील व चारित्र्यवान मनुष्य घडविते, असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. बबन चौरे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. अशोक कानडे यांनी केले, तर आभार प्रा. सलीम शेख यांनी मानले.



# न्यू आर्ट्स महाविद्यालयात वाचन पंधरवाड्यानिमित्त ग्रंथप्रदर्शन

**शेवगाव । नरहरी शहाणे**

न्यू आर्ट्स महाविद्यालय, शेवगाव येथे 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' या उपक्रमाअंतर्गत वाचन पंधरवाडा साजरा करण्यात येत आहे. पत्रकार दिनाचे औचित्य साधून ग्रंथालय विभागामार्फत मंगळवार व बुधवार (दि. ६ व ७ जानेवारी २०२६) रोजी दोन दिवसीय ग्रंथप्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. वाचनापासून दुरावत असलेल्या विद्यार्थ्यांना वाचनाकडे आकर्षित करण्यासाठी 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' हा उपक्रम महाविद्यालयात राबविण्यात येत असून, त्याअंतर्गत ग्रंथप्रदर्शन, सामूहिक वाचन, पुस्तक परीक्षण, वाचन संवाद, कथन स्पर्धा तसेच वाचन कौशल्य कार्यशाळा असे विविध उपक्रम राबविले जात आहेत. याच उद्देशाने सदर ग्रंथप्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. या प्रदर्शनाचे उद्घाटन न्यू आर्ट्स शेवगाव महाविद्यालयाचे माजी ग्रंथपाल जनार्दन लांडे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. प्रदर्शनात अभ्यासक्रमाबाहेरील मराठी, हिंदी व इंग्रजी वाचन साहित्य, विविध विषयांवरील संदर्भ ग्रंथ, चरित्रात्मक पुस्तके, शब्दकोश, सरिताकोश, सांस्कृतिक कोश, विश्वकोश आदींचा समावेश आहे. विद्यार्थ्यांना ग्रंथालयातील पुस्तके प्रत्यक्ष हाताळून वाचण्याची संधी मिळत असून, त्यातून वाचकसंख्या वाढून वाचन संस्कृती वृद्धिंगत होण्यास मदत होत आहे. वाचनामुळे व्यक्तिमत्त्वाचा विकास होतो व सामाजिक प्रबोधनाला चालना मिळते, अशी माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पुरुषोत्तम कुंदे यांनी दिली. या ग्रंथप्रदर्शनास विद्यार्थी व प्राध्यापकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. तसेच शेवगाव तालुक्यातील पत्रकार बांधवांनीही प्रदर्शनास भेट दिली. उद्घाटनप्रसंगी डॉ. छाया भालशंकर, प्रा. सोपान नवथर, प्रा. सुशीलकुमार शिंदे, प्रा. शीतल हिवाळे, प्रवीण खोमणे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन ग्रंथपाल प्रा. मिनाक्षी चक्रे यांनी केले. हा उपक्रम यशस्वी होण्यासाठी नंदू बर्डे व अयोध्या देवकर यांनी परिश्रम घेतले.

# तरुणांनो वेळीच जागे होऊन देशाच्या विकासाचे सारथी व्हावे- डॉ.संभाजी दराडे

## धनगरवाडी येथे विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिर



**नेवासा । विजय खंडागळे**

''तरुणांनो वेळीच जागे व्हा, अन्यथा इतिहासजमा व्हाल,'' असा इशारा सोनई महाविद्यालयाच्या इतिहास विभागाचे प्रमुख डॉ. संभाजी दराडे यांनी दिला. ते सोनई महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या धनगरवाडी येथे सुरू असलेल्या विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिरात 'आजचा युवक व इतिहास' या विषयावर बोलत होते. डॉ. दराडे म्हणाले की, वर्तमानाचे भान आणि भविष्याचा वेध इतिहासाच्या सुवर्णपानांतून मिळतो. पूर्वीच्या पिढ्यांनी आपल्या अनुभवांची शिदोरी इतिहासातून पुढील पिढीसाठी ठेवलेली आहे. मात्र आजचा युवक सामाजिक माध्यमांच्या अतिवापराच्या विळख्यात अडकला असून, त्यामुळे सामाजिक भान व वास्तवाची जाणीव कमी होत आहे. तरुणांनी छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले, छत्रपती शाहू महाराज, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, संत गाडगेबाबा, संत तुकडोजी महाराज यांसारख्या महापुरुषांच्या कार्याचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून सुजानतेने वाटचाल केली पाहिजे, असे त्यांनी सांगितले. आजचा युवक बेरोजगारी, गुंडगिरी, व्यसनाधीनता अशा दुष्टचक्रात अडकत चालला आहे. वेळीच पावले उचलली नाहीत तर आयुष्य निरर्थक ठरेल, असा इशाराही त्यांनी दिला. इतिहासातील प्रत्येक मोठ्या परिवर्तनामागे युवकांची ऊर्जा, धैर्य व त्याग दिसून येतो. युवकांनी इतिहासाचा केवळ वाचक न बनता इतिहासाचा निर्माता व्हावे. कोणत्याही परिवर्तनाची पहिली ठिणगी युवकांकडूनच पेटते, असे ते म्हणाले. माहिती तंत्रज्ञानाच्या युगात वाढलेला आजचा युवक विचारशील असून बदल स्वीकारणारा आहे. इतिहासाच्या अभ्यासातून राष्ट्रभक्ती व सामाजिक बांधिलकी निर्माण होते; स्वातंत्र्य, समता व न्याय यांची मूल्ये समजतात. इतिहासाची जाणीव नसलेला युवक दिशाहीन होतो, तर इतिहास जाणणारा युवक समाजाला दिशा देऊ शकतो. बेरोजगारी, करिअरविषयक अनिश्चितता, मानसिक ताण, व्यसनाधीनता व सोशल मीडियाचा अतिरेक टाळून शिक्षण व कौशल्य विकासावर भर द्यावा. संविधानिक मूल्यांचे पालन केल्यास सामाजिक समता व एकात्मता वाढीस लागून राष्ट्राच्या आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक विकासाला चालना मिळेल, असे त्यांनी प्रतिपादन केले. या कार्यक्रमास डॉ. बाळासाहेब खेडकर, डॉ. शरद औटी, डॉ. विशाल फाटके, प्रा. कावेरी ढोकणे, प्रा. पूजा काकडे, प्रा. योगेश तांबे, श्री सचिन पोंढे यांच्यासह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# सांगळे वस्ती शाळेचे 'मोबाईलचे दुष्परिणाम' गीत नंबर वन

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत संपन्न झालेल्या तालुकास्तरीय सांस्कृतिक स्पर्धेत वेळू येथील सांगळे वस्ती शाळेतील विद्यार्थ्यांनी सादर केलेले 'मोबाईलचे दुष्परिणाम' हे गीत प्रथम क्रमांकाचे मानकरी ठरले. या यशानंतर सांगळे वस्तीतील नागरिक व पालकांनी जल्लोष करत आनंद व्यक्त केला. शाळेच्या मुख्याध्यापिका संगीता मगर व शिक्षिका तनुजा शिंदे यांनी शाळेतील सुविधा व शैक्षणिक गुणवत्तेकडे विशेष लक्ष दिल्यामुळे सांगळे वस्तीची शाळा स्मार्ट होत आहे. नुकत्याच झालेल्या केंद्रस्तरीय हस्ताक्षर स्पर्धेत विद्या मारुती वडवकर (प्रथम), वेशभूषा स्पर्धेत श्रद्धा बाळासाहेब दातीर (प्रथम), वकृत्व स्पर्धेत ऋतिका योगेश डेबरे (तृतीय) तसेच वेशभूषा स्पर्धेत मयुरी हेमराज सांगळे (तृतीय) यांनी यश संपादन केले आहे. ''मी सांगळे-वेळू येथील शाळेमुळे घडलो,'' अशी भावना व्यक्त करत प्रा. केशव सांगळे यांनी सांगळे वस्ती शाळेला चार, वेळू शाळेला दोन व मुंजाबा वस्ती शाळेला दोन संगणक भेट देत संगणक शिक्षणासाठी प्रात्यक्षिक सुविधा उपलब्ध करून दिली. शाळेच्या परिवर्तनासाठी पालक व माजी विद्यार्थी पुढे येऊ लागले असून गणेश वडवकर, नरेंद्र सांगळे, सतीश डेबरे व सचिन माने यांनी शाळेबाबत सकारात्मक भूमिका ठेवली आहे. या उपक्रमाचे गटविकास अधिकारी राणी फराटे, गटशिक्षणाधिकारी कुसुमकुमारी कानडी, शिक्षण विस्तार अधिकारी सुनीता वाजे व केंद्रप्रमुख माणिक आढाव यांनी कौतुक केले.



**पत्रकार दिनाच्या पूर्वसंध्येला माळेवाडी येथील शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष अनिल औताडे यांच्या निवासस्थानी आयोजित स्नेहभोजनप्रसंगी शेतकरी संघटनेचे राज्याध्यक्ष रघुनाथ दादा पाटील यांनी मोजक्या पत्रकारांशी शेतकरी प्रश्नांवर सविस्तर संवाद साधला. या वेळी अनिल औताडे, विष्णू वाघ, शफीक बागवान, बबनराव काळे, शिवाजी पवार, अनिल पांडे, संपादक करण नवले, रवी भागवत व महेश माळवे आदि. (छाया : एक्सप्रेस फोटो)**



# परवाना शिबिरात नागरिकांना वाहतूक नियमांचे धडे

## आरटीओकडून रस्ता सुरक्षा जनजागृती उपक्रम

**शेवगाव । लक्ष्मण मडके**

प्रादेशिक परिवहन कार्यालय, अहिल्यानगर यांच्या वतीने ता. ७ जानेवारी २०२६ रोजी शेवगाव येथे आयोजित कच्चे व पक्के वाहनचालक परवाना चाचणी शिबिराच्या निमित्ताने रस्ता सुरक्षा जनजागृती कार्यक्रम उत्साहात पार पडला. या शिबिरासाठी आलेल्या वाहनचालक परवाना उमेदवारांसह उपस्थित नागरिकांना वाहतूक नियमांचे महत्त्व समजावून सांगत सुरक्षित वाहनचालनाबाबत सखोल मार्गदर्शन करण्यात आले.

दुचाकीस्वारांनी हेल्मेट परिधान करणे, चारचाकी वाहनचालकांनी सीटबेल्टचा वापर करणे, मद्यप्राशन करून वाहन न चालविणे, वाहन चालवताना मोबाईल फोनचा वापर टाळणे, तसेच नो हॉर्निंग व डू नॉट हॉर्न या नियमांचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन करण्यात आले. या वेळी मोटार वाहन निरीक्षक अनिल केदार (स. मो. वा. नि.), प्रियंका चोथे (स. मो. वा. नि.) व संकेत मारवाडी उपस्थित होते. त्यांनी नागरिकांशी थेट संवाद साधत अपघात टाळण्यासाठी वाहतूक नियमांचे पालन किती आवश्यक आहे, यावर भर दिला. कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे हेल्मेट परिधान करून आलेल्या दुचाकीस्वारांचा गुलाब पुष्प देऊन सन्मान करण्यात आला. यामुळे सुरक्षित वाहनचालनाबाबत समाजात सकारात्मक संदेश पोहोचला. तसेच या उपक्रमात तालुक्यातील नामांकित मोटार ड्रायव्हिंग स्कूलचे संचालक चंदन ढाकणे, उमेश ढगे व सागर पठाडे यांनी सक्रिय सहभाग नोंदवत आरटीओच्या रस्ता सुरक्षा जनजागृती उपक्रमाचे स्वागत केले.

# रामराव आदिक पब्लिक स्कूलमध्ये पारितोषिक वितरण समारंभ उत्साहात



**श्रीरामपूर । सलीमखान पठाण**

खासदार गोविंदराव आदिक (८७) यांच्या जयंतीनिमित्त खासदार गोविंदराव आदिक ग्रामीण शिक्षण संस्था, अशोकनगर व रामराव आदिक पब्लिक स्कूल, निपाणी वडगाव यांच्या संयुक्त विद्यमाने संस्था-अंतर्गत क्रीडा स्पर्धांचा पारितोषिक वितरण समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. गोविंदराव आदिक यांच्या प्रेरणेतून सुरू झालेल्या या क्रीडा स्पर्धांनी यंदा ३० वर्षांचा यशस्वी व गौरवशाली प्रवास पूर्ण केला असून, या काळात अनेक गुणवंत खेळाडू, शिस्तप्रिय विद्यार्थी व आत्मविश्वासी व्यक्तिमत्त्वे घडली आहेत.

कार्यक्रमाची सुरुवात खासदार गोविंदराव आदिक यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलनाने झाली. प्रास्ताविक जयंत चौधरी यांनी केले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय सरचिटणीस अविनाश आदिक, माजी नगराध्यक्षा अनुराधा आदिक, प्रा. डॉ. बबनराव आदिक, हंसराज अधिक, नितीन पवार, सुनील थोरात, सरपंच सविता देवकर, उपसरपंच जगन्नाथ जाधव, सुभाष लिंगायत, नामदेव राऊत, हरिभाऊ रेवाळे, प्राचार्य प्रसाद मुंडलिक, निलेश थोरात यांच्यासह पालक, ग्रामस्थ, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. या स्पर्धांमध्ये कबड्डी, खो-खो, धावणे, क्रिकेट, वक्तृत्व अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी सांघिक व वैयक्तिक प्रकारात आपले कौशल्य सादर केले. विजेत्या खेळाडूंना पाहुण्यांच्या हस्ते चषक, पदके व प्रमाणपत्रे देऊन गौरविण्यात आले. जनरल चॅम्पियनशिपचे विजेतेपद न्यू इंग्लिश स्कूल, निमगाव खैरी या विद्यालयाने पटकावले, तर उपविजेतेपद रामराव आदिक पब्लिक स्कूलला मिळाले. पारितोषिक स्वीकारताना विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद व अभिमान दिसून येत होता. यावेळी अविनाश आदिक यांनी खेळाचे महत्त्व अधोरेखित करत ''हार-जीतपेक्षा खेळात सहभागी होणे व खिलाडूवृत्ती जपणे महत्त्वाचे आहे,'' असा संदेश दिला. अनुराधाताई आदिक यांनी खेळामुळे शारीरिक व मानसिक विकास होतो तसेच सांघिक भावना वाढीस लागते, असे सांगत विद्यार्थ्यांनी अभ्यासासोबत खेळातही सक्रिय राहावे, असे आवाहन केले. कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन रामराव आदिक पब्लिक स्कूलच्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी केले. सूत्रसंचालन अरुण शिंदे यांनी केले, तर आभार अविनाश वाघ यांनी मानले.

# तेलसाठ्यासाठीच अमेरिकेची दंडेलशाही

इंधन तेलाने समृद्ध असलेल्या व्हेनेझुएला या देशावर अमेरिकेने हल्ला करून त्या देशाचे राष्ट्राध्यक्ष निकोलस मादुरो व त्यांच्या पत्नी सिलिया फ्लोरेस यांना जेरबंद करून अमेरिकेच्या तुरुंगात डांबले. अमेरिका व्हेनेझुएलावर हल्ला करणार याची कुणकुण जगाला काही महिन्यापूर्वीच लागली होती. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे व्हेनेझुएलावर सातत्याने टीका करत होते. व्हेनेझुएलावर हल्ला केल्यानंतर ट्रम्प यांनी या हल्ल्यामागचे कारण सांगताना सांगितले की अमेरिकेत जी बेकायदेशीर ड्रग्स विक्री होत आहे त्याला व्हेनेझुएला जबाबदार आहे. व्हेनेझुएला या देशातूनच अमेरिकेत बेकायदेशीर ड्रग्सचा पुरवठा होतो तो रोखण्यासाठी आम्ही हा हल्ला केला मात्र डोनाल्ड ट्रम्प यांचा हा दावा किती तकलादू आहे हे जगाला माहीत आहे. अमेरिकेने व्हेनेझुएलावर का हल्ला केला हे संपूर्ण जग जाणून आहे. या हल्ल्यामागचे खरे कारण हे व्हेनेझुएलातील तेल हे आहे. व्हेनेझुएला हा जगातील चौथ्या क्रमांकाचा तेल उत्पादक देश आहे. अमेरिकेला व्हेनेझुएला मधील हे तेलसाठे हवे आहेत. हे तेलसाठे मिळवण्यासाठीच अमेरिकेने व्हेनेझुएलावर हल्ला केला. अमेरिका स्वतःच्या स्वार्थासाठी आणि फायद्यासाठी कोणत्या थराला जाऊ शकते हे ट्रम्प यांनी या हल्ल्यातून दाखवून दिले आहे. ट्रम्प यांची ही दंडेलशाही निषेधार्ह आहे संपूर्ण जगाने याचा निषेध करायला हवा. अमेरिकेने केलेले हे कृत्य संयुक्त राष्ट्रसंघाच्या सनदीमध्ये नमूद केलेल्या तत्त्वांचे उल्लंघन आहे. अर्थात अमेरिकेने तेलासाठी किंवा स्वतःच्या फायद्यासाठी एखाद्या देशाची राखरांगोळी केल्याची ही पहिली वेळ नाही. स्वतःला जगाचे फौजदार समजून कोणत्याही देशावर हल्ला करायचा आणि तो देश नेस्तनाबूत करून तेथील तेलसाठे व खनिजे हस्तगत करायचे हे अमेरिकेचे धोरणच आहे. याआधीही त्यांनी असा प्रकार अनेकदा केला आहे. लिबिया या देशावर २०११ साली असाच हवाई हल्ला करून तेथील सत्ताधीश असलेल्या गद्दाफी यांची ४२ वर्षाची सत्ता संपुष्टात आणली होती. लिबिया हा आफ्रिकेतील सर्वात मोठा तेलसाठा असलेला देश होता. अमेरिकेला तो तेलसाठा हवा होता जोवर गद्दाफी सत्तेवर असतील तोवर त्यांना हा तेलसाठा मिळणार नव्हता म्हणून अमेरिकेने त्यांना हटवले त्यासाठी त्यांनी थेट त्या देशावर हवाई हल्ला केला. इराक हा असाच तेल साठ्याने समृद्ध असलेला देश. या इराकमध्ये सद्दाम हुसेन यांची हुकूमशाही होती. सद्दाम हुसेन आपल्याला तेल देणार नाही हे अमेरिका जाणून होती म्हणून मग इराकने घातक शस्त्रसाठा जमवला असून या शस्त्रांनी संपूर्ण जगाला धोका निर्माण झाला आहे अशी आवई अमेरिकेने उठवली आणि इराकने जमवलेली शस्त्रास्त्रे हस्तगत करायची आहेत असे सांगून इराकवर हल्ला केला आणि सद्दाम हुसेन यांना फासावर लटकवले मात्र ज्या घातक शस्त्रांचे कारण सांगून अमेरिकेने इराकवर हल्ला केला ती घातक शस्त्रे अमेरिकेला मिळालीच नाही. मिळणार तरी कशी? कारण तशी घातक शस्त्रे इराकमध्ये नव्हतीच. अमेरिकेला मिळाले ते इराकमधील तेलसाठे. अमेरिकेने इराकमधील तेलसाठ्यासाठी संपूर्ण इराक बेचिराख करून टाकले होते. १९८९ साली पनामा या छोट्या देशावर देखील अमेरिकेने अमली पदार्थांचा व्यापार चालू असल्याचा आरोप करून हल्ला केला होता. या हल्ल्यात ही त्या देशाचे तत्कालीन राष्ट्रप्रमुख मॅन्युअल नोरियोगा यांना अटक करून ४० वर्षांची शिक्षा सुनावली होती. या हल्ल्यामागचे मुख्य कारण हे होते की पनामा कालवा हा जागतिक व्यापारासाठी महत्त्वाचा होता. या कालव्यावर अमेरिकेला स्वतःचे नियंत्रण मिळवायचे होते. नोरियोगांना सत्तेवरून हटवल्या शिवाय अमेरिकेला पनामा कालव्यावर नियंत्रण मिळवणे अशक्य होते त्यासाठीच त्यांनी अवैध अमली पदार्थांची तस्करी केल्याचा आरोप ठेवून या देशावर हल्ला केला आणि पनामा कालव्यावर स्वतःचे नियंत्रण मिळवले. व्हिएतनाम या देशावर देखील तेलसाठ्यासाठीच अमेरिकेने अनेकदा हल्ले केले. आताही अमेरिकेने त्याच कारणासाठी व्हेनेझुएलावर हल्ला केला. आता ते व्हेनेझुएलात स्वतःच्या मर्जीतील व्यक्तीला सत्तेवर बसवतील आणि त्याच्या माध्यमातून व्हेनेझुएलातील तेलसाठ्यावर नियंत्रण मिळवतील. अमेरिकेच्या व्हेनेझुएला वरील हल्ल्याने जगात भयंकर संदेश गेला आहे. आपल्याला मान्य नसलेल्या दुसऱ्या देशाच्या नेत्यांविरोधात अशी कारवाई करता येऊ शकते हे अमेरिकेने जगाला पुन्हा एकदा दाखवून दिले आहे. भविष्यातही याची पुनरावृत्ती होऊ शकते म्हणूनच अमेरिकेच्या या दंडेलशाही विरुद्ध जगाने एकत्र यायला हवे. अमेरिकेच्या या दंडेलशाहीविरुद्ध आता संपूर्ण जगाने आवाज उठवायला हवा.



श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५
समाजसंवाद

# भटक्या कुत्र्यांच्या सर्वेक्षणाची जबाबदारी शिक्षकांवर
# शिक्षक परिषद आक्रमक

**अहमदनगर । रयत समाचार**

राज्यातील शाळा परिसरात भटक्या कुत्र्यांचा वावर रोखण्याची जबाबदारी थेट शिक्षकांवर सोपविण्यात आल्याने शिक्षक वर्गात तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. शिक्षकांच्या सन्मानाला व स्वाभिमानाला ठेच पोहोचविणारे हे परिपत्रक तात्काळ रद्द करून संबंधितांकडून दिलगिरी व्यक्त करण्यात यावी, अशी मागणी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद यांच्या वतीने राज्य सरकारकडे करण्यात आली आहे.



या संदर्भातील सविस्तर निवेदन परिषदेचे राज्य कार्याध्यक्ष तथा माजी शिक्षक आमदार नागो गाणार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे, शिक्षण सचिव रणजीतसिंह देओल तसेच शिक्षण आयुक्त यांना पाठवले असल्याची माहिती परिषदेचे अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष बाबासाहेब बोडखे यांनी दिली. शिक्षण आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या वतीने निर्गमित करण्यात आलेल्या या परिपत्रकाबाबत शिक्षक परिषदेने तीव्र खेद व्यक्त केला आहे. शिक्षक समाज घडविण्याची जबाबदारी निष्ठेने पार पाडणाऱ्या शिक्षकांचा सन्मान डावलून शाळा परिसरातील भटक्या कुत्र्यांचे सर्वेक्षण व नियंत्रणाची जबाबदारी शिक्षकांवर टाकणे हे अन्यायकारक व अपमानास्पद असल्याचे परिषदेने म्हटले आहे. विद्यार्थ्यांचे भविष्य घडविण्याचे पवित्र कार्य करणाऱ्या शिक्षकांवर सातत्याने विविध शिक्षणबाह्य कामांचे ओझे लादले जात असून त्यामुळे अध्यापन कार्यावर परिणाम होत आहे. याचा थेट फटका विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेला बसण्याची शक्यता असून शासन व प्रशासनाने शिक्षकांचा सन्मान व स्वाभिमान जपणे आवश्यक आहे, अन्यथा विद्यार्थ्यांच्या भवितव्यावर गंभीर प्रश्नचिन्ह उभे राहील, असा इशारा शिक्षक परिषदेने दिला आहे.

"शालाबाह्य कामांसाठी शिक्षकच का निवडले जातात? भटक्या कुत्र्यांवर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी स्थानिक स्वराज्य संस्थांची असताना शिक्षकांवर शिक्षणबाह्य व अशैक्षणिक कामांचा भार का टाकला जातो?" असे प्रश्न उपस्थित करत या जाचक निर्णयाविरोधात अहिल्यानगर जिल्ह्यातील शिक्षकांच्या वतीने तीव्र निषेध नोंदविण्यात येत असल्याचे जिल्हाध्यक्ष बाबासाहेब बोडखे यांनी सांगितले.



# गुणवंतांचा सत्कार करणे हे आपले कर्तव्य- राजेंद्र कोटकर

**पाथर्डी । रयत समाचार**

येथील वसंत बोर्डे यांची अखिल भारतीय बौद्ध महासभेच्या अहिल्यानगर जिल्हाध्यक्षपदी निवड झाली, तर शीघ्रकवी राजेंद्र उदारे यांची सातारा येथे अखिल भारतीय साहित्य संमेलनात "टीचर पोटासाठी" या ऊसतोड कामगारांच्या जीवनावरील कवितेची निवड झाली. श्री तिलोक जैन उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्रा. श्रीकांत काळोखे यांनी अमेरिकेस अनेकदा जाऊन तेथील विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञान व विज्ञान विषयाबद्दल प्रशिक्षण दिले व चितळी येथील प्रतीशील शेतकरी तथा कवी बाळासाहेब कोठुळे यांना जागतिक संस्थेचा सर्वश्रेष्ठ सूत्रसंचालक पुरस्कार मिळाला, याबद्दल या सर्वांचा महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती पाथर्डी शाखेच्या वतीने सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षीय भाषणात येथील सामाजिक कार्यकर्ते राजेंद्र कोटकर म्हणाले की, आपल्या तालुक्यातील कलावंत बाहेरील जिल्ह्यात व परदेशात जाऊन पाथर्डीचे नाव उंचावत असतील तर अशा गुणवंतांचा सत्कार करणे, हे आपले कर्तव्य आहे. यावेळी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन बुवाबाजी संघर्ष अहिल्यानगर जिल्हाप्रमुख शशिकांत गायकवाड, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती पाथर्डीचे सचिव डॉ. योगीराज देशमुख बुवाबाजी संघर्ष पाथर्डी तालुकाप्रमुख सुखदेव मदने, सामाजिक कार्यकर्ते हाजी हुमायून आतार, पत्रकार अनिल खाटेर, शिवाजी डोमकावळे व इतर सदस्य उपस्थित होते. शब्दगंध साहित्य परिषद-शाखा पाथर्डी,कृष्णा भोजनालय साहित्य मित्र मंडळ पाथर्डी,पत्रकार मित्र मंडळ पाथर्डी, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती पाथर्डी व चितळी ग्रामस्थ मित्र मंडळ यांनी या सर्वांचे अभिनंदन केले आहे.

# रविवारी नगरमध्ये लेखक-वाचक संवाद
## ज्ञानकौशल्य ट्रस्टकडून आयोजन

**अहमदनगर । रयत समाचार**

साहित्यिक व साहित्यरसिक यांच्यात संवाद घडून येऊन वाचन चळवळ वृद्धिंगत व्हावी, या उद्देशाने ज्ञानकौशल्य ट्रस्टतर्फे लेखकवाचक संवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम रविवार, ता. ११ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता अहिल्यानगर जिल्हा वाचनालयाच्या सावेडी येथील सभागृहात होणार आहे. याबाबत माहिती देताना ज्ञानकौशल्य ट्रस्टचे अध्यक्ष व लेखक सचिन मोहन चोभे यांनी सांगितले की, नगरचे वाचकप्रिय साहित्यिक व व्याख्याते डॉ. संजय कळमकर यांच्याशी या निमित्ताने वाचकांना थेट संवाद साधता येणार आहे. वाचकांनी विचारलेल्या प्रश्नांना लेखक उत्तरे देतील. ही एक खुली साहित्य मैफल असणार आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नाट्य अभिनेते प्रा. रवींद्र काळे असतील. अहिल्यानगर जिल्हा वाचनालय संचालित सावेडी येथील गंगा उद्यानानजीक असलेल्या मातोश्री यमुनाबाई त्र्यंबक देशमुख ग्रंथालयातील प्रा. आर. जी. कुलकर्णी सभागृहात हा साहित्य संवाद कार्यक्रम होणार आहे. नगर शहरासह जिल्ह्यातील वाचकांनी या कार्यक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# विधानसभा पोटनिवडणुकीसाठी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध
## १० हजार मतदारांची वाढ, ६७ नवीन मतदान केंद्रे

**राहुरी । रयत समाचार**

२२३ राहुरी विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीच्या पूर्वतयारीचा भाग म्हणून, भारत निवडणूक आयोग यांच्या निर्देशानुसार मंगळवार, ता. ६ जानेवारी २०२६ रोजी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. या मतदार यादीनुसार मतदारसंघात सुमारे १० हजार नवीन मतदारांची वाढ झाली असून, एकूण मतदार संख्या ३ लाख ३१ हजार इतकी झाली आहे.

तसेच मतदान केंद्रांच्या सुसूत्रीकरणानंतर ६७ नवीन मतदान केंद्रांची भर पडली असून, आता एकूण ३७४ मतदान केंद्रे असणार आहेत. प्रारूप मतदार यादीबाबत हरकती व सूचना स्वीकारण्याची मुदत २४ जानेवारी २०२६ पर्यंत असून, प्राप्त हरकतींचा निपटारा ७ फेब्रुवारी २०२६ पर्यंत करण्यात येणार आहे. अंतिम मतदार यादी १४ फेब्रुवारी २०२६ रोजी प्रसिद्ध केली जाणार आहे.

२२३ राहुरी विधानसभा मतदारसंघाची ता. ६ जानेवारी २०२६ रोजी प्रसिद्ध झालेली प्रारूप मतदार यादी (छायाचित्राशिवाय) पाहण्यासाठी व डाउनलोड करण्यासाठी https://voters.eci.gov.in/download-eroll या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहे. नागरिकांनी यादीत आपले नाव तपासून काही हरकती असल्यास विहित मुदतीत नोंदवाव्यात, असे आवाहन जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी, अहिल्यानगर यांनी केले आहे.

# सावतामाळी पाणी वापर संस्थेच्या फलकाचे अनावरण

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

श्रीगोंदा लिंक कॅनॉल १३२ वरील चारी क्रमांक १७ येथील श्री सावतामाळी पाणी वापर संस्था क्रमांक चारच्या हेड बोर्डचे अनावरण गुरुवार, ता. ८ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११ वाजता कृष्णा खोरे प्रकल्प जलसंधारण व्यवस्थापन अंतर्गत बायफ संस्थेचे कृषी सहाय्यक सुरज घोडके यांच्या हस्ते करण्यात आले. चारी क्रमांक १७ च्या टेलला, बाबुर्डी रोडलगत एस. के. लेमन कंपनी परिसरात संस्थेचा हेड बोर्ड लावण्यात आला आहे. यावेळी श्री सावतामाळी पाणी वापर संस्थेचे अध्यक्ष बाळू बाजीराव खेतमाळीस यांच्या अध्यक्षतेखाली कृष्णा खोरे प्रकल्प जलसंपदा विभागाच्या आयटीसी मिशन 'सुनहरा कल' अंतर्गत पाणी वापर संस्थांसाठी जल साक्षरता प्रशिक्षण कार्यक्रम पार पडला. या वेळी बायफ संस्थेचे कृषी अधिकारी श्री सुरज घोडके यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. कुकडी प्रकल्प सक्षम बनवून प्रकल्पावरील सर्व पाणी वापर संस्था सर्वार्थाने सक्षम व्हाव्यात, त्यांचा पाणी कोटा अबाधित राहावा तसेच सभासद व शेतकरी बांधवांचा सर्वांगीण विकास व्हावा, यासाठी शेतकऱ्यांनी वेळच्या वेळी पाणी पट्टी भरून




पाणी मागणी अर्ज सादर करावेत. भविष्यात २००५ च्या कायद्यानुसार केवळ संस्थांनाच पाणी मिळणार असून संस्था टिकल्या नाहीत तर प्रकल्पावर खाजगीकरणाचा धोका निर्माण होऊ शकतो, याची जाणीव ठेवावी. पाण्याची अडचण निर्माण झाल्यानंतरच फोन न करता, संस्थेच्या बैठकीस उपस्थित राहून अडचणी मांडाव्यात. कर्तव्यापासून दूर राहून पाणी मिळणार नाही, याची दक्षता घेऊन सभासद शेतकऱ्यांनी संस्थेला सहकार्य करावे, असे आवाहन अध्यक्ष बाळू बाजीराव खेतमाळीस यांनी केले. या वेळी संस्थेचे संचालक व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नवीन पाण्याच्या टाकीचे काम आठ दिवसांपासून ठप्प
## कामाच्या दर्जावर नागरिकांचा संशय

**शेवगाव । लक्ष्मण मडके**

शेवगाव शहरातील नागरिक गेल्या पाच ते दहा वर्षांपासून तीव्र पाणीटंचाईला सामोरे जात आहेत. दर दहा ते पंधरा दिवसांनी एकदाच पाणीपुरवठा होत असल्याने दैनंदिन जीवन विस्कळीत झाले आहे. अशा परिस्थितीत सुरू करण्यात आलेल्या नवीन पाणीपुरवठा योजनेमुळे नागरिकांच्या मनात आशा निर्माण झाली होती; मात्र ही आशा आता निराशेत बदलण्याच्या मार्गावर असल्याचे चित्र आहे. शहरासाठी अत्यंत महत्त्वाच्या पाणीपुरवठा योजनेअंतर्गत उभारण्यात येणाऱ्या पाण्याच्या टाकीचे व संबंधित कामकाज गेल्या आठ दिवसांपासून पूर्णतः बंद आहे. प्रत्यक्ष ठिकाणी कोणतीही हालचाल नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. नागरिकांच्या म्हणण्यानुसार, पाण्याच्या टाकीचे काम अपेक्षित दर्जानुसार होत नसल्याचा संशय आहे. विशेषतः कॉंक्रिटच्या कामानंतर आवश्यक असलेले क्युरिंग (पाणी मारणे) योग्य पद्धतीने केले जात नसल्याचा गंभीर आरोप करण्यात येत आहे. या संदर्भात संबंधित काम पाहणाऱ्या व्यक्तीकडे चौकशी केली असता, "येथे काम करणारे मजूर उत्तर प्रदेश व बिहार येथील असून ते सध्या बाहेरगावी गेले आहेत. दोन दिवसांत परत आल्यानंतर काम सुरू होईल," असे सांगण्यात आले. या उत्तरावरून, अहमदनगर (अहिल्यानगर) जिल्ह्यातील महत्त्वाच्या शासकीय योजनांसाठी परराज्यातील मजुरांवर मोठ्या प्रमाणावर अवलंबून राहावे लागत असल्याचे स्पष्ट होते. शेवगावसारख्या तालुक्याची पाणीपुरवठा योजना देखील परराज्यातील मजुरांवर अवलंबून असल्याचे समोर आले आहे.फ पाणीपुरवठा योजनेतील पाण्याची टाकी हा अत्यंत महत्त्वाचा घटक असताना, आठ दिवसांपासून काम पूर्णतः बंद असणे प्रशासन व ठेकेदारांच्या नियोजनावर प्रश्नचिन्ह उपस्थित करणारे आहे. स्थानिक मजूर उपलब्ध असतानाही त्यांचा वापर न करता परराज्यातील मजुरांवर अवलंबून राहणे, आणि ते मजूर बाहेरगावी गेल्यावर संपूर्ण काम ठप्प होणे, ही बाब गंभीर मानली जात आहे.



गेल्या अनेक वर्षांपासून पाणीटंचाई सहन केल्यानंतरही पाण्याच्या टाकीचे काम मजुराअभावी बंद राहणार असेल, तर शहराला नियमित पाणीपुरवठा कधी मिळणार, हा शेवगावकरांचा मुख्य सवाल आहे. या योजनेमुळे निर्माण झालेली अपेक्षा अशीच संपुष्टात आली, तर नागरिकांचा प्रशासनावरील विश्वास डळमळीत होण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.